आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१३  मार्च २०२४ - बुधवार

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज मॉरिशसचे प्रधानमंत्री प्रवींद कुमार जुगनाथ यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. वित्तीय सेवा, नागरी सेवा, कर रचना आणि तपास संस्थांच्या क्षेत्रात सहकार्य करण्यासाठी दोन्ही देशांमध्ये ४ सामंजस्य करार झाले. यावेळी भारताच्या अर्थसहाय्यानं उभारलेल्या काही विकासकामांचं लोकार्पणही झालं.

मॉरिशस दौऱ्यावर असलेल्या राष्ट्रपतींनी आज पोर्ट लुईसमधल्या आप्रवासी घाट आणि आंतरखंडीय गुलाम संग्रहालयाला भेट दिली. भारत आणि आफ्रिकन देशातून येणाऱ्या मजूरांना याठिकाणी ठेवलं जात असे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज देशातल्या ३ सेमीकंडक्टर प्रकल्पांची दूरदृश्य प्रणालीद्वारे पायाभरणी केली. गुजरातमधलं ढोलेरा आणि साणंद तसंच आसाममधल्या मोरीगावमध्ये सव्वा लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करुन हे प्रकल्प उभारले जाणार आहेत. येत्या काळात भारत या क्षेत्रात आघाडीचं स्थान मिळवेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. आयआयटी, आयआयएम यासह १ हजार ८०० हून अधिक राष्ट्रीय संस्था आणि केंद्रीय विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांशी त्यांनी संवाद साधला.

**<><><><><>**

निवडणूक रोख्यांची सर्व माहिती केंद्रीय निवडणूक आयोगाला दिल्याचं प्रतिज्ञापत्र स्टेट बँकेनं सर्वोच्च न्यायालयात दाखल केलंय. १२ एप्रिल २०१९ ते १५ फेब्रुवारी २०२४ दरम्यान खरेदी झालेल्या आणि रोखीकरण झालेल्या निवडणूक रोख्यांची माहिती बँकेनं दिली आहे. या कालावधीत २२ हजार २१७ निवडणूक रोख्यांची खरेदी झाली. त्यापैकी २२ हजार ३० निवडणूक रोख्यांचं चलनीकरण

झालं, असंही बँकेनं सांगितलं आहे. निवडणूक रोख्यांची खरेदीची तारीख, खरेदी करणाऱ्याचे नाव, निवडणूक रोख्यांची किंमत ही माहिती दिल्याचं प्रतिज्ञापत्रात नमूद आहे. याशिवाय या निवडणूक रोख्यांचं चलनीकरण कधी झालं, कोणत्या राजकीय पक्षाला हा निधी मिळाला ही माहिती यात दिली आहे.

**<><><><><>**

परिवहन विभागाच्या १८७ इंटरसेप्टर वाहनांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईत हिरवा झेंडा दाखवला. या इंटर सेप्टर वाहनांमुळे सुरक्षित प्रवास होण्यास मदत होणार असल्याचं मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटलं. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून एकात्मिक वाहतूक व्यवस्थापन प्रणाली कार्यान्वित करावी, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी परिवहन विभागाला दिल्या.

**<><><><><>**

राज्यातल्या 100 महाविद्यालयांमध्ये सुरू असलेल्या कौशल्या विकास केंद्रांना आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र असे नाव देण्यात आल्याची घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. लवकरच 1 हजार महाविद्यालयांमध्ये ही केंद्र सुरू होणार असून या उपक्रमाचा लाभ महाविद्यालयातील युवक आणि युवतींनी घ्यावा, असे आवाहनही फडनवीसांनी केलं.

**<><><><><>**

माजी मंत्री आणि काँग्रेसचे नेते पद्माकर वळवी यांनी आज भाजपामध्ये प्रवेश केला. प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस विनायक देशमुख, प्रदेश सचिव अर्चना राठोड यांच्यासह काँग्रेसच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत आज भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

**<><><><><>**

भारत जोडो न्याय यात्रेच्या निमित्तानं आज काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज धुळे शहरात रोड शो केला आणि छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ उपस्थित जनसमुहाला संबोधित केलं. यावेळी खुल्या वाहनात बसून राहुल गांधीं यांनी लोकांशी थेट संवाद साधला. त्यापूर्वी त्यांनी माजी मंत्री रोहिदास पाटील यांची भेट घेतली.

**<><><><><><>**

बुलडाणा जिल्ह्यात आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेअंतर्गत पहिल्यांदाच खुबारोपण शस्त्रक्रिया झाली. या शस्त्रक्रियेचा सर्व खर्च जनआरोग्य योजनेतून झाला. जिल्ह्यात या योजनेचे १८ लाखांहून अधिक लाभार्थी असून सुमारे ७ लाख जणांनी आयुष्मान कार्ड घेतलं आहे. ५ लाख रुपयांपर्यंतच्या मोफत उपचारासाठी आयुष्मान कार्ड काढण्याचं आवाहन जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी केलं आहे.

**होल्ड - बुलडाणा जिल्हाधिकारी**

**<><><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत मुंबईत वानखेडे स्टेडिअमवर सुरु असलेल्या अंतिम सामन्यात आज चौथ्या दिवशी विदर्भाच्या दुसऱ्या डावात ४ बाद १५५ धावा झाल्या आहेत. विदर्भाच्या एकाही सलामीवीराला अर्धशतकही गाठता आलं नाही. जिंकण्यासाठी त्यांना आणखी ३८३ धावांची गरज आहे.

**//<><><><><><>//**